**जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या गाव, तालुका, जिल्हा, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी, जिल्हाधिकारी, व्यक्ति व अशासकीय संस्था यांना पुरस्कार देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंधारण विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मफुअ- २०१३/प्र.क्र.३७/जल-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

तारीख : ९ ऑगस्ट, २०१७

**<u>ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक</u>**

(१) जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ दिनांक ५ डिसेंबर, २०१४.

(२) मफुअ-२०१३ /प्र.क्र.३७ / जल-८ दिनांक २८ सप्टेंबर, २०१६.

**<u>प्रस्तावना :</u>**

राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर, २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. सदर अभियानात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या गाव, तालुका, जिल्हा, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी, जिल्हाधिकारी, व्यक्ति व अशासकीय संस्था यांना पुरस्कार प्रदान करण्यासंदर्भातील पुरस्काराचे स्वरुप, पात्रतेसाठीच्या अटी, निकष तसेच पुरस्कारासंबंधी निवड समितीची रचना यासंदर्भातील शासन निर्णय दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयात राज्यस्तरीय निवड समितीच्या अध्यक्षांनी दिलेल्या निदेशानुसार अंशत: बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गाव, तालुका, जिल्हा, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी, जिल्हाधिकारी, व्यक्ति व अशासकीय संस्था यांना पुरस्कार प्रदान करण्यासंदर्भातील संदर्भाधीन क्र. २ येथील दि. २८/९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये पुरस्काराचे स्वरुप, पात्रतेसाठीच्या अटी, निकष तसेच पुरस्कारासंबंधी निवड समितीची रचना इ. बाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत दिलेल्या सूचनांमध्ये सन २०१६-१७ च्या पुरस्कारासाठी व त्यानंतरच्या कालावधीत निवड करण्यात येणाऱ्या पुरस्कारांसाठी अंशत: बदल करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून, सदर बदल पुढीलप्रमाणे आहेत.

१) सन २०१६-१७ साठी व त्यानंतरच्या कालावधीत निवड करण्यात येणा-या पुरस्कारांसाठी जिल्हास्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी व गुणांकन त्या त्या विभागातील विभागीय पुरस्कार निवड समितीमार्फत न करता सदर प्रस्तावांची छाननी व गुणांकन अन्य विभागातील विभागीय पुरस्कार निवड समितीमार्फत करण्यात यावी. सदर विभागीय समित्या अथवा त्यांनी नियुक्त केलेली द्विसदस्यीय समिती अन्य विभागातील प्राप्त प्रस्तावांची छाननी करेल सदर विभागीय समिती अंतिम गुणांकन करेल. एका विभागाची समिती दुसऱ्या विभागातील प्रस्तावांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे नव्याने विभागीय छाननी समिती गठीत करण्यात येत आहे.

| **महसूल विभाग** | **छाननी करणारी विभागीय समिती** |
|---|---|
| कोकण विभाग | विभागीय समिती, नाशिक |
| पुणे विभाग | विभागीय समिती, कोकण |
| नाशिक विभाग | विभागीय समिती, औरंगाबाद |
| औरंगाबाद विभाग | विभागीय समिती, अमरावती |
| नागपूर विभाग | विभागीय समिती, पुणे |
| अमरावती विभाग | विभागीय समिती, नागपूर |

**२)** विभागस्तरावरुन छाननी झाल्यानंतर असे प्रस्ताव अंतिम निवडीसाठी राज्यस्तरीय समितीकडे सादर करावेत.

**३)** अधिकारी/कर्मचारी पुरस्कार - राज्यस्तरावर प्रति जिल्हा १ अधिकारी / कर्मचारी याऐवजी प्रति जिल्हा १ अधिकारी व १ कर्मचारी असे प्रति जिल्हा २ पुरस्कार देण्यात यावेत. असे एकूण ६८ पुरस्कार राज्यस्तरावरुन द्यावयाचे असून राज्यस्तरावरील पुरस्कारांची संख्या विचारात घेता सदर जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी पुरस्कार विभागीय स्तरावर निवडून विभागस्तरावरील कार्यक्रमात देण्यात यावेत.

**४)** त्याचप्रमाणे मंत्रालय खुद्द येथील जलसंधारण विभागातील २ अधिकारी व २ कर्मचारी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल (एकूण ४) असे संदर्भाधीन दि. २८/९/२०१६ च्या शासन निर्णयात नमूद केलेले आहे. त्याऐवजी मंत्रालय खुद्द-१ अधिकारी व १ कर्मचारी, प्रत्येक महसूल विभागातून-१ अधिकारी व १ कर्मचारी, आयुक्त/संचालक, मृद व जलसंधारण-१ अधिकारी व १ कर्मचारी असे **राज्यस्तरावरुन एकूण १६ पुरस्कार** देण्यात यावेत.

**५)** जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या **पत्रकारांना** देण्यात येणाऱ्या पुरस्काराच्या रकमेत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| | | **दिनांक २८/९/२०१६ च्या शा.नि. नुसार बक्षिसाची रक्कम** | | **बक्षिसाची सुधारीत रक्कम** | |
|---|---|---|---|---|---|
| **स्तर** | **पुरस्काराची संख्या** | **बक्षिसाची रक्कम** | **एकूण रक्कम (रु.लाखात)** | **बक्षिसाची रक्कम** | **एकूण रक्कम (रु.लाखात)** |
| **जिल्हा स्तर** | ०३ प्रती जिल्हा (३४x३=१०२) | प्रथम क्र. रु.१५०००/- | रु.१२.५८ | प्रथम क्र. रु.३१,०००/- | रु.२२.७८ |
| | | द्वितीय क्र. रु. १२०००/- | | द्वितीय क्र. रु. २१,०००/- | |
| | | तृतीय क्र. रु.१००००/- | | तृतीय क्र. रु.१५,०००/- | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **विभागीय स्तर** | ०३ प्रती विभाग (६x३=१८) | प्रथम क्र. रु.३००००/- | रु.३.९० | प्रथम क्र. रु.५०,०००/- | रु.६.६० |
| | | द्वितीय क्र. रु. २००००/- | | द्वितीय क्र. रु. ३५,०००/- | |
| | | तृतीय क्र. रु.१५०००/- | | तृतीय क्र. रु.२५,०००/- | |
| **राज्य स्तर** | ०३ | प्रथम क्र. रु.५००००/- | रु.१.१० | प्रथम क्र. रु.१,००,०००/- | रु.२.२२ |
| | | द्वितीय क्र. रु. ३५०००/- | | द्वितीय क्र. रु. ७१,०००/- | |
| | | तृतीय क्र. रु.२५०००/- | | तृतीय क्र. रु.५१,०००/- | |
| | **एकूण** | | **रु. १७.५८** | | **रु.३१.६०** |

**६)** पत्रकारांच्या संदर्भाधीन दि. २८/९/२०१६ च्या शासन निर्णयातील वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मिडियातील पत्रकार यांना दयावयाच्या गुण व निकषामध्ये (१) संख्यात्मक बाबीमध्ये एकूण प्रसिध्द केलेल्या लेख, लेखामाला अग्रलेख, वृत्तकथा संख्या म्हणजेच १.१ व १.२ मिळून ४० गुणाऐवजी २५ गुणच राहतील. तर त्यातील १५ गुण हे २.३ मधील (ड) मध्ये समाविष्ट करुन ५ गुणाऐवजी तेथे २० गुण देण्यात येतील.

सदंर्भाधीन दिनांक २८/९/२०१६ च्या गाव, तालुका, जिल्हा, पत्रकार, अधिकारी/कर्मचारी, जिल्हाधिकारी, व्यक्ति व अशासकीय संस्था यांना दयावयाच्या पुरस्काराच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबी, उपरोक्त बाबींव्यतिरिक्त कायम राहतील.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१७०८०९१२२१०५०५२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.**

Machhindranath R Shelke

Digitally signed by Machhindranath R Shelke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=422bf862d9fee2734c8e15a0366a265ee1ac1ad3cf944f3bc14563fa5e2610b5, cn=Machhindranath R Shelke
Date: 2017.08.09 12:47:33 +05'30'

**( म. रं. शेळके )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा.विरोधी पक्षनेते विधान परिषद व विधानसभा यांचे सचिव,

४. मा.मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री, (जलसंधारण) याचे खाजगी सचिव
६. सर्व मा.मंत्री, राज्यमंत्री याचे खाजगी सचिव,
७. कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती,
८. मुख्य सचिव यांचे सहसचिव,
९. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालयीन विभाग,
१०. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त,
१२. आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३. सर्व जिल्हाधिकारी,
१४. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. सामाजिक वनीकरण वृत्ते,
१६. सर्व मुख्य संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१७. सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे,
१८. मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे
१९. प्रधान मुख्य वनसंरक्षक व संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
२०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२१. सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
२२. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२३. सर्व उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय ( सर्व),
२४. सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२५. सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे/ सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे, (स्थानिक स्तर)
२६. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता ),
२८. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
२९. सर्व मुख्य वन संरक्षक व उपसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते,
३०. सर्व सहसंचालकवनसंरक्षक,/ सर्व उपवनसंरक्षक,
३१. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,
३२. महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषदेचे सर्व अशासकीय सदस्य,
३३. महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३४. महालेखापाल, (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर,
३५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३६. सर्व मंत्रालयीन विभाग,
३७. कृषि व पदुम विभाग (राकृवियो कक्ष), मंत्रालय, मुंबई
३८. संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
३९. सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, जलसंधारण विभाग,
(जलसंधारण उप विभाग), मंत्रालय, मुंबई
४०. जल-८ (निवड नस्ती), ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय, मुंबई